# भारताचे संविधान शरमले !

१० ऑगस्ट २००९ रोजी महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांचे आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने ‘‘ **न भुतो न भविष्यती ’’ असा निर्णय जाहीर केलेला आहे.** हा निर्णय महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. अशोकराव चव्हाण साहेब यांच्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात आहे. मा. मुख्यमंत्री महोदय हे नांदेड जिल्ह्यातीलच असून महाराष्ट्र राज्याच्या होवू घातलेल्या विधानसभा निवडणूकांच्या पुर्वसंधेला घेतलेला हा निर्णय भारताच्या संविधानाला हतबल करील असा निर्णय आहे.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकिंग रेग्युलेशन ॲक्टचे १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार नवीन ठेवी स्विकारणे किंवा जुन्या ठेवी परत करणेचे बंधन घातलेले आहे. आणि महाराष्ट्रातील ही एकमेव जिल्हा बँक अशा प्रकारात मोडते. जिल्हा बँकेस ठेवी स्विकारणे व अदा करणे ह्यावर भारतीय रिझर्व्ह बँकेने निर्बंध घालण्याची वेळ का आली व त्याला जबाबदार कोण यांचेवर थेट कारवाई करण्याच्या ऐवजी अत्यंत चमत्कारीक व भयावह असा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे.

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ह्यापुर्वीच महाराष्ट्र शासनाकडून १०० कोटी रूपयांचे कर्ज घेतले होते. तसेच शासनाने याच बँकेत २० कोटी रूपये भाग - भांडवलही गुंतविले होते. **म्हणजेच महाराष्ट्र शासनास या बँकेकडून एकूण १२० कोटी रूपये येणे बाकी होते.** दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शासनाने गुंतविलेल्या भाग - भांडवलापैकी १० कोटी रूपये रक्कम बिनव्याजी ठेवीमध्ये रूपांतरीत केली. म्हणजेच नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून महाराष्ट्र शासनास आता फक्त ११० कोटी रूपये येणे बाकी राहिले होते.

परंतु महाराष्ट्र शासनाने या देशाचे संविधान बाजूला ठेवून **नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ११० कोटी रूपये कर्जाची रक्कम ही अनुदानात रूपांतरीत केली**. म्हणजेच आता नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस महाराष्ट्र शासनास कर्जाचे १०० कोटी रूपये व भाग - भांडवलाचे १० कोटी रूपये देणे शिल्लक राहिलेले नाही. म्हणजेच ही जिल्हा बँक आता कर्ज मुक्त झालेली आहे. **शेतकऱ्याचे व ठेवीदारांचे हित या अत्यंत बेगडी तत्व प्रणालीवर** हे सर्व पध्दतशीर घडवून आणले. हे प्रथमदर्शनीच कोणाच्याही लक्षात येईल.

सगळ्यात कहर म्हणजे महाराष्ट्र शासनाने नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला ६ टक्के व्याजदराने ३१/०३/२०११ पर्यंतच्या मुदतीकरता शासनास परतपेड करण्याच्या अटीवर हे १०० कोटी रूपये कर्ज दिलेले होते. ती मुदत संपण्याच्या अगोदरच शासनाने **शेतकरी व ठेवीदारांचे हित या गोंडस शब्दाखाली** भारतीय रिझर्व्ह बँकेला थेट आव्हान करून बँकेचा नेटवर्थ पॉझिटीव्ह करण्याच्या नावाखाली या देशातील अर्थव्यवस्थेला या उदाहरणामुळे निश्चितपणे धोका पोहचविलेला आहे. अशा **कर्जाच्या रकमा अनुदानात रूपांतरीत करण्याचा निर्णय या देशाचे आर्थिक कंबरडे भविष्यात मोडल्याशिवाय राहणार नाही** असेच चित्र सर्वसामान्यांना उभे राहताना दिसेल.

एका बाजुला महाराष्ट्र शासनाने राज्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व अनेक जिल्हा बँका यांच्या

माध्यमातून राज्यातील साखर कारखान्यांना ‘‘ थकहमी ’’ च्या अटीवर कर्जे देण्यास भाग पाडले, ह्या १५०० ते २००० कोटी रूपयांची शासनाने व्याजासहित कर्ज परतफेडीची थकहमी घेतली आहे. राज्यातील ३ ते ४ कारखाने वगळता बहुतेक सर्व कारखान्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती बँकांची पध्दतशीरपणे थकबाकी करून बँकांना प्रचंड अडचणीत आणलेले आहे. बँकांनी या साखर कारखान्यांना दिलेले कर्ज महाराष्ट्र शासनाच्या थकहमीच्या अटीवर दिलेले आहे. परंतु महाराष्ट्र शासन व भारतीय रिझर्व्ह बँक हे दोघेही एकमेकांच्या आड लपून सर्व सामान्य जनतेच्या पैशाचा भर दिवसा तमाशा करताना दिसतात. देशातील किंवा राज्यातील कुठलीही यंत्रणा व व्यवस्था ह्याबाबत बोलायला तयार नाही. **सत्ताधारी व विरोधी पक्षातील सर्व जण अशा प्रकरणात कसे गप्प बसले** हा खरा प्रश्न छोट्या माणसासमोर आहे.

महाराष्ट्र शासनाला असा दुजाभाव कायद्यात कुठलाही बदल करून सुध्दा करता येणार नाही. कारण राज्यातील राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती बँका यांचे **१५०० ते २००० कोटी रूपये तसेच पतसंस्थांमधील ठेवीदारांची रक्कम परत करण्यासाठी अडचणीत आलेले १००० कोटी रूपये रक्कम शासनाने सर्व प्रथम संस्थांना अनुदाना स्वरुपात देऊन संविधानाचा आदर राखायला पाहिजे** अन्यथा उद्या दुसऱ्या जिल्ह्याचा मुख्यमंत्री जर या राज्याचा झाला तर त्या जिल्ह्यातील कुठलीहि वित्तीय संस्था किंवा कुठलीहि वित्त लुबाडणारी बाब पुढे करून या राज्याचा आर्थिक चेहरा विद्रुप करील, यात शंका नाही.

या देशाची लोकशाही मुळात एवढी भरभक्कम असताना व समान न्याय देण्याची संविधानामध्ये स्पष्ट तरतुद असताना नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे हे प्रकरण कसे हाताळले जाऊ शकते व त्याबद्दल न्यायाचा व त्यातून शिस्तीचा आसूड अद्याप का फटकारला गेला नाही याबद्दल ज्यांच्याकडे अंतीम अधिकार आहे त्यांनी वेळीच कारवाई करणे आवश्यक आहे. अन्यथा न्यायव्यवस्था सुध्दा उद्या अशा प्रकरणाबाबत काय भुमिका घेईल याबाबत वाट बघण्याशिवाय सर्वसामान्य जनतेस पर्याय शिल्लक राहत नाही.

माझा हा अग्रलेख जे जे वाचणार आहेत व ज्यांचा विवेक अद्यापही जिंवत आहे ते या प्रकरणी कसे वागतात हे यापुढे बघावे लागेल. शरमलेले भारताचे संविधान पुन्हा ताठ मानेने उभे राहिले पाहिजे त्यासाठी सत्य व न्यायाची ज्वाला बेफान वेगाने पेटली पाहिजे.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!